संतोष सदाशिव गांजाळे व इतर
विरुध्द
कोणीही नाही.

<u>२ रे सह दिवाणी न्यायाधीश, घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे यांचे न्यायालयात</u>

( <u>पिठासीन अधिकारी : श्रीमती स्नेहा सुनिल पुळूजकर</u> )

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.११/२०२६

१) **संतोष सदाशिव गांजाळे,**
वय : – ५० वर्षे, व्यवसाय : – शेती,
रा : – मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे.

२) **सिताराम सबाजी गांजाळे,**
वय : – ७५ वर्षे, व्यवसाय : – शेती,
रा : – पिंपळवंडी, ता. जुन्नर, जि. पुणे.

३) **बंडु सबाजी गांजाळे,**
वय : – ६८ वर्षे, व्यवसाय : – शेती,

४) **विठ्ठल सबाजी गांजाळे,**
वय : – ६३ वर्षे, व्यवसाय : – शेती,

५) **श्रीमती लिलाबाई मारुती गांजाळे,**
वय : – ७५ वर्षे, व्यवसाय : – गृहिणी,

६) **श्रीमती चंद्रभागा बाजीराव गांजाळे,**
वय : – ७० वर्षे, व्यवसाय : – गृहिणी,

७) **विकास बाजीराव गांजाळे,**
वय : – ४३ वर्षे, व्यवसाय : – शेती,

८) **किरण बाजीराव गांजाळे,**
वय : – ४१ वर्षे, व्यवसाय : – शेती,

९) **नवनाथ बाजीराव गांजाळे,**
वय : – ३९ वर्षे, व्यवसाय : – शेती,

१०) **श्रीमती जनाबाई गणपत गांजाळे,**
वय : – ६५ वर्षे, व्यवसाय : – गृहिणी,

११) **रावजी सबाजी गांजाळे (मयत) वारस**

१) **श्रीमती अंजनाबाई रावजी गांजाळे,**
वय : – ७९ वर्षे, व्यवसाय : – गृहिणी,

१) **सुशिला रामदास वर्पे,**
वय : – ५४ वर्षे, व्यवसाय : – गृहिणी,

१२) **श्रीमती सुवर्णा संजय गांजाळे,**
वय : – ४५ वर्षे, व्यवसाय : – गृहिणी,

१३) **साई संजय गांजाळे,**
वय : – २१ वर्षे, व्यवसाय : – शिक्षण,

१४) **संस्कृती संजय गांजाळे,**
वय : – १८ वर्षे, व्यवसाय : – शिक्षण,
अ.पा.क. तर्फे आई श्रीमती सुवर्णा संजय गांजाळे,
वय : – ४५ वर्षे, व्यवसाय : – गृहिणी,
वरील क्र.१, ३ ते १३ रा. मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे. ... **अर्जदार.**

**विरुध्द**

**कोणीही नाही ... जाबदेणार.**

*******************************************************************

**अर्जदारतर्फे वकील :-** श्री. चेतन बी. उदावंत

*******************************************************************

## निशाणी क्र.१ खालील आदेश

प्रस्तुत अर्ज बॉम्बे रेग्युलेशन एक्ट १८२७ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

**अर्जदाराचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे.**

२. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार गणा उर्फ गणाजी धोंडीबा गांजाळे हे त्यांचे मुळ पुरुष असुन त्यांना तुकाराम, रामभाऊ, सबाजी व सदाशिव असे चार मुले होती. त्यापैकी रामभाऊ व तुकाराम हे त्यांच्या लग्नापुर्वीच मयत झाले असल्याने त्यांना सबाजी व सदाशिव हेच वारस होते. सबा उर्फ सबाजी गणा उर्फ गणाजी गांजाळे हे मयत असुन अर्जदार क्र. २ ते ११ हे कायदेशीर वारस आहेत. सदा उर्फ सदाशिव गणा उर्फ गणाजी गांजाळे हे मयत असुन अर्जदार क्र. १, १२ ते १४ हे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार क्र.११ रावजी सबाजी गांजाळे हे मयत असुन अर्जदार क्र.११.१ श्रीमती अंजनाबाई रावजी गांजाळे व अर्जदार क्र.११.२ सुशिला रामदास वर्पे हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे मयत रामभाऊ गणा उर्फ गणाजी गांजाळे यांना अर्जदार व्यतिरिक्त अन्य कोणीही कायदेशीर वारस नाही. सबब मयत रामभाऊ गणा उर्फ गणाजी गांजाळे यांच्या वारसांची नोंद होणेसाठी अर्जदार मा. मंडल अधिकारी, मंचर येथे गेले असता संबंधित मंडल अधिकारी यांनी वारस नोंद करण्यासाठी न्यायालयातुन वारस प्रमाणपत्र आवश्यक असल्याचे सांगितले. त्यामुळे अर्जदार यांनी सदरचा अर्ज दाखल केला असुन अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

३. सदर अर्जावर दि.१३/०४/२०२६ रोजी जाहिर नोटीस व दैनिक वृत्तपत्रात प्रकाशन करण्याचा आदेश निशाणी क्र.१ वर करुन अर्जावर हरकत असल्यास सदर हरकत

नोंदविण्याचे आव्हान करण्यात आले. त्यानुसार दैनिक वृत्तपत्र 'प्रभात' येथे दि.२१/०४/२०२६ रोजी जाहीर प्रगटन प्रकाशीत करण्यात आले. त्याप्रमाणे जाहिर नोटीस दि.२७/०५/२०२६ रोजी नोटीस बोर्डावर चिटविण्यात आली. परंतु त्या आजपावेतो कोणतीही हरकत दाखल झालेली नाही.

४. अर्जाचे, पुरावा प्रतिज्ञापत्राचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदारांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

५. अर्जाच्या निकालाकरीता न्यायालयासमोर उपस्थित झालेले मुद्दे त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसे सहित पुढील प्रमाणेः

| **अनु.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदाराने असे सिध्द केले आहे का की, अर्जदार हे मयत रामभाऊ गणा उर्फ गणाजी गांजाळे यांचे एकमेव कायदेशीर वारस आहेत का ? | होय. |
| २. | अर्जदार हे विनंती केल्याप्रमाणे वारस दाखला मिळण्यास पात्र आहेत का ? | होय. |
| ३. | काय आदेश ? | अर्ज मंजुर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ व २ करीता.**

६. सर्व मुद्दे एकमेकांशी संबंधीत असल्याने वारंवारीता टाळण्यासाठी एकत्रित चर्चेस घेण्यात येत आहे.

७. अर्जदारांनी त्यांच्या अर्जाच्या पृष्टर्थ खालील नमुद कागदपत्रे अभिलेखावर दाखल केली आहे.

- अर्जदार क्र. १ व ३ यांचे आधार कार्डाची साक्षांकित प्रती,
- मयत रामभाऊ गणा उर्फ गणाजी गांजाळे यांच्या मृत्यु दाखल्याची प्रत.
- मयत रावजी सबाजी गांजाळे यांच्या मृत्यु दाखल्याची प्रत.
- उर्वरीत अर्जदारांच्या आधार कार्डची प्रत.
- अर्जदार क्र. १२ यांच्या पॅन कार्डची प्रत.
- मारुती सबाजी गांजाळे, बाजीराव सबाजी गांजाळे, गणपत सबाजी गांजाळे, संजय सदाशिव गांजाळे, सबाजी गणाजी गांजाळे, सदाशिव गणाजी गांजाळे, तुकाराम गणाजी गांजाळे यांच्या मृत्यु दाखल्याच्या प्रती.

८. अर्जदार क्र. १ व ३ यांनी त्यांच्या पुराव्याचे प्रतिज्ञापत्रात अर्जात नमुद केल्याप्रमाणे कथन केले.

९. वर नमुद केल्याप्रमाणे 'प्रभात ' या वर्तमानपत्रामध्ये जाहीरनामा प्रकाशीत करुन देखील सदर अर्जास विरोध व हरकत करण्याकरीता न्यायालयासमोर कोणीही हजर झालेले नाही. त्यामुळे अर्जदाराने सादर केलेला पुरावा अबाधीत राहिलेला आहे. अर्जदारांनी दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसुन येते की, मयत रामभाऊ गणा उर्फ गणाजी गांजाळे यांचे अर्जदार हे एकमेव कायदेशीर वारस आहेत.

१०. अर्जदार हे मयत रामभाऊ गणा उर्फ गणाजी गांजाळे यांचे कायदेशरी वारस असल्याबाबत कोणीही हरकत घेतली नाही. सबब अर्जदार हे वारस दाखला मिळणेस पात्र आहेत. म्हणुन मुद्दा क्र.१ व २ चे उत्तर होकारार्थी नोंदविण्यात येते.

<u>**मुद्दा क्र. ३ करीता.**</u>

११. मुद्दा क्र.१ व २ चे उत्तर होकारार्थी नोंदविण्यात आल्याने मुद्दा क्र. ३ च्या

उत्तरादाखल खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१) अर्ज मंजुर करण्यात येतो.

२) अर्जदार हे मयत **रामभाऊ गणा उर्फ गणाजी गांजाळे** यांचे कायदेशीर वारस आहेत असे प्रमाणित करण्यात येते व आवश्यक ती कोर्ट फीस भरल्यानंतर बॉम्बे रेग्युलेशन एक्ट १८२७ मधील नियम २ मधील परीशिष्ट - ब प्रमाणे वारस दाखला देण्यात यावा.

३) अर्जदारांनी सिव्हल मॅन्युअलच्या परीच्छेद ३१२ ची पुर्तता करावी.

**सही/-**

**( स्नेहा सुनिल पुळूजकर )**
**२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर**
**घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे.**

**दिनांक - ०८/०७/२०२६.**
**घोडेगाव**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file are the same word for word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Court | : | Smt. Sneha Sunil Pulujkar, 2nd Jt. C.J.J.D. and J.M.F.C., Ghodegaon, Dist. Pune. |
| Name of the Steno | : | J. S. Kaite, Steno Grade - III. |
| Order date | : | 08/07/2026 |
| Order signed by P.O. on | : | 08/07/2026 |
| Order uploaded on | : | 08/07/2026 |